महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖ईमेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक: साशा कार्या/ब-५/करोना/रुग्ण/महालोर-मुरूड/रद्द/२०२० दिनांक :२७/०६/२०२०.

**वाचले:-**

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपाययोजना नियम, २०२०
७. तहसिलदार मुरुड यांजकडील पत्र क्र.प्रशा/कात-४/कोरोना पॉझिटिव्ह/महालोर/२०२०, दिनांक २३/५/२०२०.
८. या कार्यालयाचे आदेश क्र. साशा/कार्या/ब-५//करोना रूग्ण/महालोर/मुरूड/२०२०, दि.२४/०५/२०२०.
९. तहसिलदार मुरूड यांचेकडील पत्र क्र.प्रशा/कात-४/कोरोना प्रतिबंधीत क्षेत्र/महालोर/वगळणे/२०२०, दिनांक २६/६/२०२०.

---

**आदेश,**

ज्याअर्थी, रायगड जिल्हयातील मुरूड तालुक्यातील मौजे एकदरा येथे कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, मौजे **महालोर, ता.मुरूड येथील गावठाण क्षेत्रातील श्री.लक्ष्मण आदावडे यांचे घरापासून ते श्री.दिलीप पाटील यांचे (अनिल इप्ते रहात आहेत ते घर) घरापर्यंतचा समोरील व मागील परिसर** त्यासमोर नमूद दिनांकापासून या कार्यालयाकडील उपोद्घातातील अ.क्र.८ कडील आदेशान्वये Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त Containment Zone मधील कोरोना बाधित व्यक्ती व त्याच्या संपर्कात आलेल्या ५ व्यक्ती हया कोविड-१९ आजारातून बऱ्या झालेल्या आहेत. तसेच त्यानंतर आजतागायत सदर गावी कोरोना विषाणूची लक्षणे असलेला रूग्ण आढळून आलेला नाही व सदर झोन घोषीत करून २८ दिवस कालावधी पूर्ण झालेला असल्याने सदर Containment Zone रद्द करण्याबाबत तहसिलदार मुरूड यांनी दि.२६/०६/२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

त्याअर्थी, वरील वस्तुस्थिती व तहसिलदार मुरूड यांचे दि.२६.०६.२०२० चे पत्र विचारात घेता, मौजे महालोर, ता. मुरूड, जि. रायगड येथील कोरोना बाधित व्यक्ती व त्याच्या संपर्कात आलेल्या ५ व्यक्ती हया कोविड-१९ आजारातून बऱ्या झालेल्या आहेत. प्रतिबंधीत क्षेत्रातआद्याप पर्यंत कोरोना विषाणू मूळे नव्याने संसर्ग झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले, **मौजे महालोर, ता.मुरूड येथील गावठाण क्षेत्रातील श्री.लक्ष्मण आदावडे यांचे घरापासून ते श्री.दिलीप पाटील यांचे (अनिल इप्ते रहात आहेत ते घर) घरापर्यंतचा समोरील व मागील परिसर Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रातून वगळण्याबाबतचे आदेश देत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/--
**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग

प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्याधिकारी, नगरपालिका मुरूड यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार मुरूड यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- पोलीस निरीक्षक, मुरूड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, मुरूड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, मुरूड यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

(रविंद्र मठपती)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
नोडल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड